| | |
|---|---|
| दाखल तारीख | ०३.०८.२०२१ |
| नोंदणी तारीख | ०३.०८.२०२१ |
| निकाल तारीख | १०.०८.२०२६ |
| कालावधी | ०५वर्षे,००म.,०८दि |

## भाग 'अ'
## (न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)
## {फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (१)}

| | |
|---|---|
| | **निशाणी क.३०** |
| **कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, कारंजा घा. यांचे न्यायालय**<br>पिठासीन अधिकारी :- दिक्षा दि. विघ्ने | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क. ०१६०/२०२१<br>पोलिस ठाणे कारंजा घा. |
| न्यायनिर्णयाची तारीख | १०/०८/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | **नियमित फौजदारी खटला क्रमांक ३४/२०२१** |
| | CNR No. MHWR090002762021 |
| तक्रारकर्ता /अभियोग | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलिस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे कारंजा घा., |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्रीमती एम. एस. चांदोरे**<br>(विशेष सहायक सरकारी वकील) |
| आरोपी | **१. कैलास दामोधर डोंगरे,**<br>वय- ३० वर्षे, धंदा- ऑटो चालक,<br>**२. विलास दामोधर डोंगरे,**<br>वय- ३२ वर्षे, धंदा- ऑटो चालक,<br>दोघे रा. हेटीकुंडी, ता. कारंजा घा., जि. वर्धा. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री. डी. टी. मोटवाणी,**<br>(बचाव पक्षातर्फे वकील) |

## भाग 'ब'
## {फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (२)}

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २८.०५.२०२१ |
| पहिल्या खबरीची तारीख | २८.०५.२०२१ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ०३.०८.२०२१ |
| दोषरोपनिश्चीती तारीख | ०३.०८.२०२१ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ११.१०.२०२१ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | १०.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | १०.०८.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | -- |

## आरोपीबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कैलास दामोधर डोंगर | आरोपीला अटक करण्यात आले नाही | दिनांक ०३.०८. २०२१ | भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ सहकलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | --- |
| २. | विलास दामोधर डोंगरे | आरोपीला अटक करण्यात आले नाही | दिनांक ०३.०८. २०२१ | भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ सहकलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | --- |

**भाग 'क'**

**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (३)}**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षदारांची यादी**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क. १ | रोशन निळकंठ बनसोड (निशाणी १५) | घटनास्थळ पंच क.२ |
| सा.क. २ | नितीन गोकूलराव डांगे (निशाणी २५) | साक्षदार |
| सा.क. ३ | राजू रामकृपाल चौबे (निशाणी २६) | घटनास्थळ पंच क.१ |
| सा.क. ४ | चंद्रशेखर दमडूजी गजभिये (निशाणी २९) | साक्षदार |

**ब. बचाव पक्ष :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

**क. न्यायालयातर्फे :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने निशाणीबध्द दस्तांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u> :**

| अ.क. | निशाणी कमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी **पी-१६**/सा.क्र.१ | पंचनामा वरील सही |
| १ | निशाणी **पी-२७**/सा.क्र.१ | सुचनापत्रावरील सही |
| २ | निशाणी **पी-२८**/सा.क्र.१ | घटनास्थळ पंचनामावरील सही |

**ब. <u>बचाव पक्षातर्फे</u> :**

| अ.क. | निशाणी कमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

**क. <u>न्यायालयातर्फे</u> :**

| अ.क. | निशाणी कमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

**ड. <u>महत्वाच्या सुचना</u> :**

| अ.क. | महत्वाची वस्तु कमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | -- |

**<u>न्यायनिर्णय</u>**
**(आज दिनांक १० ऑगस्ट २०२६ रोजी घोषीत)**

आरोपींविरूध्द भारतीय दंड विधान, १८६० (यापुढे भादंवि) चे कलम ३२४, ५०४ सहकलम ३४ नुसार शिक्षापात्र अपराधासाठी संपरिक्षा चालविण्यात आली.

२. अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे की, दिनांक २८.०५.२०२१ रोजी दुपारी ०४.३० वाजताच्या दरम्यान फिर्यादी बबलु निरंजन वाघ हा हेटीकुंडी झोपडपट्टी येथे असतांना आरोपी कैलाश डोंगरे व विलास डोंगरे तिथे आले व त्याला म्हणाले की, तुझ्या मागे पुढे कोण आहे बे, तुला मी केव्हाही मारू शकतो. तर फिर्यादीने त्यांना म्हटंले की, तुम्ही मला का शिवीगाळ करीत आहे. असे म्हटंले असता आरोपी कैलाश डोंगरे याने फिर्यादीला लोखंडी रॉड छातीवर मारला तसेच तो रॉड आरोपी विलास डोंगरे याने फिर्यादीच्या डोक्यावर मारला. त्यामुळे रक्त निघून फिर्यादी जखमी

झाला. नंतर फिर्यादी घरी गेला व त्याच्या भावा सोबत पोलीस स्टेशन कारंजा घा. येथे जावून आरोपींविरूध्द तक्रार दिली. फिर्यादीच्या फिर्यादवरून आरोपींविरूध्द भा.द.वी. चे कलम ३२४, ५०४ सहकलम ३४ अंतर्गत अपराध क्र.१६०/२०२१ नोंद करण्यात आला. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी गुन्हयाचा तपास केला. तपासा दरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षदारांचे बयाण नोंदवले, जखमीचा वैद्यकीय अहवाल प्राप्त केला, जप्त रॉडची क्युरी करून घेतली. आरोपींविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांच्या विरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

३. आरोपी न्यायालयासमोर हजर झाल्यानंतर आरोपींविरुध्द नि.क्र.१२ वर दोषारोप निश्चीत केले. सदर दोषारोप आरोपींना वाचुन व समजावुन सांगीतले असता त्यांनी नि.क्र.१३ व १४ अन्वये गुन्हा कबुल नसल्याचे सांगुन संपरिक्षा पुढे चालु ठेवण्याची विनंती केली. अभियोग पक्षातर्फे पुरावा नोंदवुन झाल्यानंतर आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुरावा मिळुन आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये नि.क्र.२८ व २९ वर आरोपींचे जबाब नोंदविण्यात आले.

४. अभियोग पक्षातर्फे विदवान सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एम. एस. चांदोरे आणि बचावपक्षाचे विदवान वकील श्री डी. टी. मोटवाणी यांचा युक्तिवाद ऐकला. आरोपींविरुध्द ठेवलेल्या दोषारोपावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले असुन मी त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह देत आहे.

| **अ.क्र.** | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकला काय की, दिनांक २८.०५.२०२१ रोजी दुपारी १६.३० वाजताच्या दरम्यान मौजा हेटीकुंडी येथे आरोपींनी संगणमत करून फिर्यादी बबलु वाघ याला लोखंडी रॉडने मारहाण करून ईच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे भांदविचे कलम ३२४ सहकलम ३४ नुसार शिक्षापात्र असलेला अपराध केला? | **...नाही...** |
| **२.** | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकला काय की, दिनांक २८.०५.२०२१ रोजी दुपारी १६.३० वाजताच्या दरम्यान मौजा हेटीकुंडी येथे आरोपींनी संगणमत करून फिर्यादी बबलु वाघ याच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा व तसे होण्याची संभव असल्याची जाणीव असतांना उद्देशपूर्वक अपमान करून त्यांना प्रक्षोभित केले व त्याद्वारे भांदविचे कलम ५०४ सहकलम ३४ नुसार शिक्षापात्र असलेला अपराध केला? | **...नाही...** |
| **३.** | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

**<u>मुद्दा क. १ ते ३ करीता :-</u>**

५. मुद्दा क.१ व २ हे एकमेकांशी सुसंगत असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता दोन्ही मुद्दे एकत्रीत चर्चिले जात आहे.

६. मुद्दा क.१ व २ सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाला हे सिध्द करणे गरजेचे आहे की, आरोपींनी संगणमत करून लोखंडी रॉड या शस्त्राचा वापर करून फिर्यादीला ईच्छापूर्वक दुखापत पोहोचवली तसेच फिर्यादी कडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने त्याला अपमानीत करून प्रक्षोभित केले. सदर घटक सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने एकूण चार साक्षदार तपासले. साक्षदार क.१ व ३ हे पंच साक्षदार असून त्यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, ते फिर्यादीला ओळखतात परंतु त्यांच्या समक्ष कोणताही घटनास्थळ पंचनामा झाल्याचे त्यांनी नाकारले आहे. घटनास्थळ पंचनाम्यावरील सही त्यांनी मान्य केली परंतु त्यातील मजकूर त्यांना माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने भा.पू.का. चे कलम १५४ प्रमाणे सुचक प्रश्न विचारले. त्यामध्ये सुध्दा त्यांनी सर्व सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली. त्यामुळे सदर साक्षदारांच्या पुराव्यावरून घटनास्थळ पंचनामा सिध्द झाला नाही.

७. तसेच अभियोग पक्षाने स्वतंत्र साक्षदार यांना साक्षदार क.२ व साक्षदार क.४ म्हणून तपासले. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे हे दोन्ही साक्षदार घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षदार आहे. परंतु दोन्ही साक्षदारांनी त्यांच्या पुराव्यात घटना काय घडली हे त्यांना माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षदारांना भा.पु.का. चे कलम १५४ प्रमाणे सुचक प्रश्ने विचारण्यात आली. परंतु त्यामध्ये सुध्दा आरोपी विरूध्द कोणताही गुन्हा दर्शक पुरावा वदवून घेता आला नाही. त्यामुळे या स्वतंत्र साक्षदारांचा पुरावा सुध्दा आरोपी वरील गुन्हा सिध्द करण्याकरीता उपयोगाचा नाही.

८. सदर प्रकरणामधील फिर्यादी बबलु वाघ याला अनेकदा समंन्स, जमानती वारंट तसेच अजमानती वारंट काढण्यात आले परंतु संमन्स व जमानती वारंटची तामीली होवून सुध्दा सदर फिर्यादी प्रकरणात साक्ष देण्याकरीता हजर झाला नाही. सदर प्रकरण हे पाच वर्ष जुने असून सन २०२१ पासून प्रलंबीत होते. तसेच या प्रकरणातील

फिर्यादी हा प्रकरणात साक्ष देण्याकरीता सतत गैरहजर असल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. त्यामुळे सदर प्रकरणात फिर्यादीची साक्ष नोंदविण्यात आली नाही. त्यामुळे या प्रकरणातील तोंडी रिपोर्ट व छापील प्रथम खबर अहवाल ईत्यादी दस्त सिध्द झाले नाही.

९. फौजदारी प्रकरणामध्ये आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी साक्षदार यांची साक्ष महत्वाची असते. परंतू सदर प्रकरणातील फिर्यादी हा वारंवार संधी देवून सूध्दा न्यायालयात साक्ष देण्याकरीता हजर झाला नाही. अभियोग पक्षाने तपासलेले साक्षदार क्र.१ ते ४ यांच्या पुराव्यात आरोपींविरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा आलेला नाही. त्यामुळे भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ अंतर्गत आरोपी वरील दोषारोप सिध्द करण्याकरीता आवश्यक असलेले घटक सिध्द झाले नाही. एकंदरीत आरोपींवरील दोषारोप सिध्द झाले नाही. त्यामुळे आरोपी हे सदर दोषारोपातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात.

१०. अभिलेखावरील वरीलप्रमाणे अभियोगपक्षाच्या पुराव्याच्या अवलोकनावरुन आरोपींविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा दिसुन येत नाही. त्यामुळे पुराव्या अभावी आरोपींविरुध्द ठेवलेले दोषारोप सिध्द होत नाही. परिणामी, आरोपी त्याच्यांविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. सबब, मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवून त्याप्रमाणे निष्कर्ष देते. तसेच मी मुद्दा क्र.३ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

**१)** आरोपी क्र.१ कैलास दामोधर डोंगरे व आरोपी क्र.२ विलास दामोधर डोंगरे यांना भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२४ सहकलम ३४ च्या दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२)** आरोपी क्र.१ कैलास दामोधर डोंगरे व आरोपी क्र.२ विलास दामोधर डोंगरे यांना भारतीय दंड विधान १८६० चे कलम ५०४ सहकलम ३४ च्या दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

**३)** आरोपीचे वैयक्तीक बंधपत्रे व जामीनदाराचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येतात.

४) सदर गुन्हयात पोलीस स्टेशन कारंजा घा. येथे मालमत्ता क.५०/२०२१ मध्ये जप्त असलेला पोकळ लोखंडी रॉड मुल्यहीन असल्याने अपील कालावधी नंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा.

५) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७ (अ) अन्वये वरिष्ठ न्यायालयात अपील अगर इतर बाबीसबंधी हजर राहणे कामी प्रत्येकी १५,०००/– रुपयेचे वैयक्तीक बंधपत्र व त्याच रकमेचे जामीनपत्र दाखल करावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत व घोषीत करण्यात येते.)**

DIKSHA DINESH VIGHNE
Digitally signed by DIKSHA DINESH VIGHNE
Date: 2026.08.10 17:34:30 +0530

(दिक्षा दि. विघ्ने)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कारंजा घा.

दिनांक: १०.०८.२०२६